भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

CM 528917

30 SEP 2024

अनु. क्र. ९५६५५ दि. ........ मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार पार्टनरशीप डीड

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन........

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव वास्तु डेव्हलपर्स

पत्ता तळे.

दुसऱ्या पक्षकाराचे नांव........

हस्ते व्यक्तीचे नाव व पत्ता निलेश भोसले तळे.

श्री चंद्रकांत तानाजी चिटे

परवाना क्र. २२०८००३

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही जिजामाता चौक, तळेगांव दाभाडे

या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

उप कोषागार कार्यालय वडगांव मावळ

18 SEP 2024

उप कोषागार अधिकारी मावळ

"वास्तु डेव्हलपर्स"

भागीदारी निवृत्ती करार

[PARTNERSHIP RETIREMENT DEED]

आम्ही खालील भागीदार आज दिनांक ३० सप्टेंबर २०२४ वार सोमवार रोजी भागीदारी करार लिहून देतो की,

१) सौ. उज्वला निलेश भोसले.

वय - ३८ वर्ष

राहणार - सुज्ञा,पंचवटी कॉलनी,

तळेगाव दाभाडे , ता – मावळ, जिल्हा पुणे – ४१० ५०६ .

सौ. उषा मधुकर चिंचकर

२. श्री. गौरव विश्वास भेगडे .
वय - ३९ वर्ष
राहणार - कडोलकर कॉलनी,
तळेगाव दाभाडे , ता – मावळ, जिल्हा पुणे – ४१० ५०६ .

३. सौ. उषा मधुकर चिंचकर .
वय - ६९ वर्ष
राहणार - प्लॉट नं. १०३,वृंदावन, आकृती अविन्यु समोर ,
नविन दत्तनगर ,वाकड, पुणे – ४११ ०५७

ज्याअर्थी आम्ही वरील भागीदार क्र. १ ते ३ यांनी "वास्तु डेव्हलपर्स ". या नावाने भागीदारीत व्यवसाय करीत आहोत .

तसेच भागीदार सौ. उषा मधुकर चिंचकर हे भागीदारीतुन स्वइच्छेने निवृत्त होऊ इच्छित असल्याने आणि त्यास इतर भागीदारांनी मान्यता दर्शविल्याने दि. ३०.०९.२०२४ पासून निवृत्त होत आहेत आणि म्हणून दिनांक ३०.०९.२०२४ रोजी भागीदारी निवृत्ती करार पत्र लिहून ठेवीत आहोत त्यामुळे आम्ही सर्व भागीदार खालील अटी व तरतूदीनुसार हे भागीदारी निवृत्ती पत्र लिहुन ठेवीत आहोत .

१. तसेच भागीदार सौ. उषा मधुकर चिंचकर हे भागीदारीतून स्वइच्छेने निवृत्त होऊ इच्छित असल्याने आणि त्यास इतर भागीदारांनी मान्यता दर्शविल्याने दि. ३०.०९.२०२४ पासून निवृत्त होत आहेत .

**२. भागीदारी संस्थेचे नांव ः-**
सदर भागीदारी संस्थेचे नांव "वास्तु डेव्हलपर्स" हेच राहील. सर्व भागीदारांच्या संमतीने सदर नाव भागीदारांना बदलता येईल .

**३. भागीदारी संस्थेचा नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता ः-**
भागीदारी संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय तसेच व्यवसायाचा पत्ता पंचवटी कॉलनी, तळेगाव दाभाडे , ता – मावळ, जिल्हा पुणे – ४१० ५०६ . असे राहील. सदर ठिकाण सर्व भागीदारांच्या संमतीने बदलता येईल. तसेच व्यवसायाचे अतिरिक्त ठिकाण सर्व भागीदारांना मान्य असेल अशा ठिकाणी ठरवले जाईल .

**४. व्यवसायाचे स्वरूप :-** भागीदारी संस्थेचा व्यवसाय जमीन खरेदी करणे, विकसित करणे , बांधकाम करणे ,फ्लॅट/बंगले आणि व्यवसायिक बांधकाम तयार करून विकणे हा राहिल . इत्यादी. तसेच या व्यवसायास पुरक असा सर्व भागीदारांना मान्य असणारा इतर कोणताही व्यवसाय करणे .

**५. भागीदारांचे भांडवल ः-**
प्रत्येक भागीदाराने भागीदारी व्यवसायाच्या सुरवातीस रू. २१000/- भांडवल म्हणून आणावयाचे आहेत. तसेच भागीदारांनी व्यवसायाचे भांडवाल त्याच्या नफा-तोटा हिश्श्या प्रमाणे आणावयाचे आहे. सदरचे भांडवल हे वेळोवेळी एकमेकांच्या संमतीने उभारण्यात येईल.

सौ. उषा मधुकर चिंचकर

G.V.Bhegade

VBhosale

६ .नफा .तोटा विभागणी ः- .

प्रत्येक हिशोवाचे वर्ष अखेरीस व्यवसायातील नफा व तोटा यांचा हिशोब केला जाईल. भांडवलाच्या हिश्याप्रमाणे दोन्ही भागीदारांनी व्यवसायातील नफया तोटयामध्ये खालील टक्केवारी प्रमाणे हिस्सा राहील

| | | |
|---|---|---|
| ०१ | सौ .उज्वला निलेश भोसले | ५०.००% |
| ०२ | श्री .गौरव विश्वास भेगडे | ५०.००% |

७ .भागीदारांना द्यावयाचा पगार ः -

वरील पैकी दोन्ही भागीदार हे व्यवसायात कियाशील राहतील व त्यामुळे त्यांना सम प्रमाणात पगार देण्यात येईल .

| | | |
|---|---|---|
| १ | वार्षिक हिशोबाप्रमाणे धद्यांत तोटा आला किंवा पुस्तकी नफा रू.३00000 पर्यंत | रू .१५0000 किंवा पुस्तकी नफ्याच्या ९0 टक्के या पैकी जी जास्त असेल ती रक्कम |
| २ | रू .३00000 पेक्षा जास्त होणाय्रा पुस्तकी नफ्यावर | वर कॉलम १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिक ३00000 पेक्षा जास्त नफा असेल त्याच्या ६0टक्के रक्कम |

खुलासा ः- .

या शर्तीखाली "पुस्तकी नफा" म्हणजे आयकर कायदा कलम ४0 वी मध्ये पुस्तकी नफ्याची जी व्याख्या केली आहे त्याप्रमाणे किंवा त्यात आलेल्या कायदेशीर दुरूस्तीप्रमाणे किंवा नवीन करण्यात आलेला कायदा,ज्यावेळी अंमलात असेल. त्याप्रमाणे वर लिहिल्याप्रमाणे पगाराची रक्कम काम करणाय्रा भागीदारांना समप्रमाणात दिली जाईल.

काम करणा,या भागीदारांना जास्तीत जास्त वरील प्रमाणे देय असलेला पगार हा त्यांना हिशोब वर्षाच्या शेवटच्या दिवशी देय झाला असे समजण्यात येईल. सदर भागीदारी व्यवसायात तोटा येत असल्यास पगार देणे किंवा न देणे हे सर्व भागीदारांच्या सहमतीने त्या त्या वेळी ठरवले जाईल. तसेच आयकर कायदा १९६१ मधील कलम "४0 वी" अन्वये देण्यात येणारा पगार हा जास्त असणार नाही.

८ .कर्ज भांडवल ः-व्यवसायात लागणारे भांडवल वरील भागीदारांनी गरजेनुसार आणावयाचे आहे तसेच बँका. वित्तीय संस्था व आवश्यक वाटल्यास इतर व्यक्तींकडुन भागीदारी संस्थेस लागणारे कर्ज भांडवल सर्व भागीदारांच्या संमतीने उभारता येईल.

९ .भागीदारांच्या भांडवलावरील व्याज ः-

भागीदारीने व्यावसाय चालु ठेवणा,या प्रत्येक भागीदारास त्याच्या भांडवल तसेच कर्ज खात्यावर जास्तीत जास्त द.सा.द.शे.१२ टक्के दराने किंवा आपांपसात जो दर ठरवतील त्याप्रमणे किंवा आयकर कायदा "४0 वी" प्रमाणे जो दर ठरविण्यात आला आहे त्या दराने सरळ व्याज दयावयाचे आहे. एखाद्या भागीदाराच्या खात्यात त्यांच्याकडुन येण्याची रक्कम निघत असेल तर त्यालाही त्याच दराने सरळ व्याज आकारले जाईल.

१० .भागीदारी बँक व इतर व्यवहार ः-

भागीदारी संस्थेचे नांवे एक वा अनेक बँकात खाते उघडता येतील. फर्मच्या दैनंदिन व्यवहारातून प्राप्त झालेली पण हातात ठेवण्यास आवश्यक नसलेली सर्व रक्कम बँकेत जमा करण्यात येईल. सदर भागीदारी संस्थेतील बँक खाते

UBhosale G.V.Bhegade सौ. उषा मधुकर चिंचकर

हे दोन्ही भागीदारांच्या सयुंक्त सहीने चालविले जाईल. तसेच खात्याचा व्यवहार व चेक देणे हे काम भागीदारीच्या नावाने करावयाचे आहे. सदर बॅंक खात्यात सर्व प्रकारच्या कॅश केडीट व ओव्हर ड्राफ्ट अगर सर्व तत्सम खात्याचा समावेश राहिल. भागीदारी व्यवसायाची स्थावर मालमत्ता तारण ठेऊन कर्ज घेता येईल. कर्जासंबंधीचे निर्णय व व्यवहार भागीदारांच्या संमतीने करावयचे आहेत.

तसेच बॅंके व्यतिरिक्त होणारा कागदोपत्री तसेच सरकारदरबारी व इतर तत्सम व्यवहारात भागीदारांना मान्य असलेल्या दोन्ही भागीदारांच्या सयुंक्त सहीने करण्यात येतील.

११. हिशोब वर्ष :-

भागीदारी व्यावसायाचे हिशोब व्यवस्थित ठेवण्यात यावेत. भागीदारी व्यवसायासंबंधी असणारी अर्थिक व इतर माहिती एका भागीदाराने दुसऱ्या भागीदारास वेळोवेळी सांगितली पाहिजे. भागीदारी व्यवसायाचे पहिले हिशोब वर्ष ३१ मार्च २०२५ रोजी संपेल आणि त्यापुढिल आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील. भागीदारी व्यवसायाचे हिशोब वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील व येणारा निव्वळ नफा अगर तोटा व ताळेबंद प्रत्येक वर्षी ३१ मार्च अखेर करण्यात यावेत. तसेच वेळोवेळी करण्यात आलेल्या कायदेशीर दुरूस्ती प्रमाणे हिशोब वर्ष ठरविला जाईल.

१२. भागीदारींची उचल :-

भागीदारांना आवश्यक असणारी उचल भागीदारांनी एकमेकांच्या संमतीने करावी.

१३. सदर भागीदारी संस्थेचे सर्व हिशोब पूर्ण करून निवृत्त होणारे भागीदार क. ३. सौ. उषा मधुकर चिंचकर यांच्या भांडवल खात्यावर जमा असणारी रक्कम आपण म्हणजेच भागीदारी चालू ठेवणा-या भागीदारांनी आज रोजी दिलेली आहे. वरील रक्कम अदा केली असल्याने निवृत्त होणारे भागीदार क. ३ सौ. उषा मधुकर चिंचकर यांचा वास्तु डेव्हलपर्स या भागीदारी संस्थेत कोणत्याही प्रकारचे देणे - घेणे अथवा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही.

१४. भागीदारीची मुदत :-

अ. सदर भागीदारी आपणास जमेल तितके दिवस चालवण्याची आहे. म्हणजेच भागीदारीचे स्वरूप "पार्टनरशिप ॲटवील" असे राहील.

ब. आपणापैकी कोणासही सदर भागीदारीतुन निवृत्त व्हावयाचे असेल तर त्याने तसे एक महिना आगोदर दुसऱ्या भागीदारास लेखी कळविले पाहिजे नोटिसमध्ये नमूद केलेल्या तारखेपासून तो भागीदार निवृत्त झाला असे समजण्यात येईल. भागीदाराच्या निवृत्त झालेल्या दिवसापर्यंत हिशोब तयार केले जातील आणि धंदयातील त्या वेळेपर्यंतची सर्व देणी वजा करून राहिलेला त्याच्या वाटयाचा हिस्सा हा त्या वेळेचा धंदयातील हिशोब पाहून तीन महिन्यात त्या भागीदारास देण्यात येईल. अन्यथा उर्वरीत रक्कमेवर १२ % वार्षिक व्याज त्यास दयावे लागेल. सदर भागीदारीतुन निवृत्त होताना "गुडविल" म्हणजे "नांवलौकिकाचा" फायदा त्यास मिळणार नाही.

क. कोणत्याही भागीदाराचे निधन झाल्यास अगर वेडा झाल्यास किंवा तो इतर कारणासाठी अपात्र झाल्यास सदर भागीदारी संस्था विसर्जित न करता त्याच्या कायदेशीर वारसास या भागीदारी संस्थेचा भागीदार म्हणुन समावेश करण्यात येईल. मृत भागीदाराला देण्यात येणाऱ्या नफा तोटा व्याज आणि पगाराची रक्कम तो निधन झालेल्या तारखेपर्यंत त्याचा भांडवल खात्यावर जमा केली जाईल. सदर रक्कम मृत झालेल्या भागीदाराच्या वारसास हिशोब वर्ष संपल्यानंतर देण्यात यावी.

सौ. उषा मधुकर चिंचकर

G. V. Bhegade

V. Bhosale

ख.  कोणत्याही इतर व्यक्तीला सदर भागीदारी संस्थेत सर्व भागीदारांच्या संमतीने प्रवेश दिला जाईल .

१५ . भागीदारांच्या जबाबदाऱ्या व हक्क :-

अ.  व्यवसायासंबंधी असणारी कोणतीही गोष्ट सर्वांनी एकमताने व एकविचाराने करावी.

ब.  प्रत्येक भागीदाराने आपल्या खाजगी कर्जापोटी किंवा कोणत्याही वैयक्तीक बोजापोटी भागीदारी संस्थेस जबाबदार धरू नये.

क.  प्रत्येक भागीदाराने व्यावसायाच्या संदर्भात त्याच्या कडील असलेल्या कागदपत्राची व तपशीलाची माहिती इतर भागीदारांना दिली पाहिजे.

१६ . लवादाची नेमणुक :-

जर आपणापैकी सदर भागीदारीच्या कलमाच्या अर्थासंबंधी अगर भागीदारी व्यवसायासंबंधी काही मतभेद निर्माण झाले तर आपण शक्यतो आपापसात चर्चा विनीमय करून सोडवायचे आहेत. अथवा लवादाची नेमणूक करून मिटवायचे आहेत. लवादाचा निर्णय सर्व भागीदारांवर बंधनकारक राहील आणि हा निर्णय पुणे न्याय कक्षेत मर्यादित राहिल.

१७ . दुरूस्त्या, बदल इत्यादीसंबंधी :-

वरील भागीदारीमध्ये ज्या अटी अगर शर्तींची योजना केलेली नाही. तसेच ज्या अटी अगर शर्तींची योजना केलेली आहे व त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे अशा सर्व दुरूस्त्या व बदल सर्व भागीदारांच्या संमतीने लेखी स्वरूपात करण्यात येईल व ती या भागीदारी कराराचा एक भाग समजण्यात येईल.

१८ . भागीदारी कायदा १९३२ :-

भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये व दुरूस्ती अन्वये त्याकाळी अस्तित्वात असलेल्या कायद्याप्रमाणे सदरची भागीदारी चालू राहील.

येणे प्रमाणे ठरवून आपण दिनांक ३० सप्टेंबर २०२४ वार सोमवार पासून सदर भागीदारी सुरू केली आहे वरील भागीदारीपत्र आम्ही भागीदारांनी स्वखुशीने व अक्कलहुशारीने या भागीदारी पत्रातील अटी व नियम समजावूण घेऊन त्यांच्या परीणामांची जाणीव असताना हे भागीदारीपत्र लिहूण ठेवले आसून त्याप्रमाणे या भागीदारीपत्रावर साक्षीदारांसमक्ष सह्या केलेल्या आहेत.

सौ. उषा मधुकर चिंचकर

G.V. Bhegade

V Bhosale

साक्षीदार .

१. Nilesh Bhosale
Talegaon Dabhade

(signature)

२. Harshad Javheri
Talegaon Dabhade.

Harshad Javheri

भागीदारीपत्र लिहुन ठेवणारे भागीदार

U Bhosale.

१. सौ. उज्वला निलेश भोसले.
( भागीदारी चालू ठेवणारा भागीदार )

G.V. Bhegade

२. श्री. गौरव विश्वास भेगडे.
(भागीदारी चालू ठेवणारा भागीदार)

सौ. उषा मधुकर चिंचकर

३. सौ. उषा मधुकर चिंचकर.
( निवृत्त होणारा भागीदार )

THANK YOU

your payment has been successfully processed

UserName
UJWALA NILESH BHOSALE
Email ID
nilesh.vastudevelopers@gmail.com
Mobile
8378908009
Service Name
ROF
Application Number
ROFP20241000088
Form Type
E

| Charges | Amount |
|---|---|
| Registration Fee | 1200.00 |
| Penalty | 0.00 |
| Service Charges | 20.00 |
| (SGST) State Goods and Service Tax 9.00 % | 1.80 |
| (CGST) Central Goods and Service Tax 9.00 % | 1.80 |
| Total Amount (In Rs.) | 1223.60 |

Print Cancel

# निबंधक भागीदारी संस्था (म. रा) यांचे कार्यालय, पुणे

| भागीदारी संस्था क्रमांक | MPA83518 |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| Application No. | ROFP20241000088 | Receipt No. | PUM000014555 |
| VASTU DEVELOPERS यांच्याकडून | | | |
| रुपये/पैसे (अक्षरी) | One Thousand Two Hundred Only | | |
| खालील बाबींसाठी फी म्हणून मिळेल | | | |

| | रुपये | पैसे |
|---|---|---|
| भारतीय भागीदारी अधिनियमाचे कलम ५८ अन्वये भागीदारी संस्थेच्या वितरणपत्राची नोंदणी | 0 | 00 |
| भारतीय भागीदारी अधिनियमाचे कलम ६०, ६१, ६२, ६३(१) (१) (१अ)(२) आणि ६४ (२) खाली फेरफारांची नोटीस Form Ea | 1200 | 00 |
| पाठविलेली निवेदने नोंदण्याकरिता भारतीय भागीदारी अधिनियमाच्या कलम ५९-अ-१/६९-अ अन्वये आकारण्यात आलेले दंड | 0 | 00 |
| निरीक्षणाकरिता | 0 | 00 |
| नकलेकरिता | 0 | 00 |
| इतर | 0 | 00 |
| एकूण | 1200 | 00 |

10 Oct 2024

तारीख

निबंधक भागीदारी संस्था,

महाराष्ट्र राज्य

This is computer generated receipt, no signature or stamp required

ROF PUNE

**For Office Use Only**

| | | | |
|---|---|---|---|
| Application No. | ROFP20241000088 | Receipt No. | PUM000014555 |
| Firm Name | VASTU DEVELOPERS | | |
| Fees | 1200 | Other Charges | |
| Penalty | 0 | | |
| Fees Paid Date | 10 Oct 2024 | | |
| Acknowledged By | | Acknowledged Date | 14 Oct 2024 |
| Verified By | | Approved By | |
| Firm Registration No. | MPA83518 | Registration Date | |